अशोक कोर्टीकर, पंढरपूर.

☐ व्ही. शांतारामनी नायकाची भूमिका केलेले हिंदी-मराठी चित्रपट कोणकोणते? नायिका कोण?

— बोलपटांच्या आगमनानंतर व्ही. शांतारामनी एकाही मराठी चित्रपटात नायकाची भूमिका केलेली नाही. *डॉ. कोटणीस की अमर कहानी*(जयश्री), *परछाई*(जयश्री-संध्या), *दो आँखे बारह हाथ*(संध्या), *स्त्री*(संध्या) या हिंदी चित्रपटात त्यांनी नायकाची भूमिका केली.

भरत चंद्रकांत कालुवाला,
माहिम कॉजवे, मुंबई.

☐ 'होठ है तेरे दो लाल हिरे...'(रफी, दिलराज कौर), 'कैसे दिन बिते कैसी बिती रतिया...'(लता), 'सारंगा तेरी याद में...'(मुकेश), 'मुझको इस रात की तनहाई में...'(मुकेश), 'रूप तेरा ऐसा दर्पन में ना समाय...'(किशोर), 'अंधेरे में जो बैठे है...'(महेंद्र कपूर) ही गाणी कोणत्या चित्रपटातील? कलाकार, संगीतकार, निर्माता, दिग्दर्शक कोण? कोणत्या वर्षी चित्रपट प्रदर्शित झाला?

— क्रमशः *हीरा मोती*(१९७९) कलाकारः शत्रुघ्न सिन्हा, रिना रॉय, डॅनी, अजित, ओम शिवपुरी, नरेंद्रनाथ, संगीतकार ओ. पी. नय्यर, निर्माता रतन मोहन, दिग्दर्शक चांद. *अनुराधा*(१९६०) कलाकारः बलराज साहनी, लीला नायडू, अभि भट्टाचार्य, बेबी राणू, नझीर हुसेन, हरी शिवदासानी, मुकरी, रशीद खान, असित सेन, आशिमकुमार, मानव चिटणीस, भुदो अडवाणी, संगीतकार रविशंकर, निर्माता एल. बी. लुल्ला, दिग्दर्शक हृषिकेश मुखर्जी. *सारंगा*(१९६०) कलाकारः जयश्री गडकर, सुदेशकुमार, निलोफर, निरंजन शर्मा, बी. एम. व्यास, इंदिरा बन्सल, संगीतकार सरदार मलिक, निर्माता शरद प्रॉडक्शन, दिग्दर्शक धीरूभाई देसाई. *दिल भी तेरा हम भी तेरे*(१९६०) कलाकारः बलराज साहनी, उषा किरण, धर्मेंद्र, कुमकुम, सुशील, मोहन चोटी, हरी शिवदासानी, जानकीदास, संगीतकार कल्याणजी-आनंदजी, निर्माता-दिग्दर्शक अर्जुन हिंगोरानी. *एक कली मुस्काई*(१९६८) कलाकारः अशोककुमार, जॉय मुखर्जी, मीरा जोगळेकर, निरुपा रॉय, ललिता पवार, नाना पळशीकर, सुंदर, मलिमा, संगीतकार मदनमोहन, निर्माता-दिग्दर्शक वसंत जोगळेकर *संबंध*(१९६९) कलाकार देव मुखर्जी, अंजना, प्रदीपकुमार, अनिता दत्त, सुलोचना, विजया चौधरी, अचला सचदेव, अभि भट्टाचार्य, नाना पळशीकर, उल्हास, लीला मिश्रा, संगीतकार ओ. पी. नय्यर, निर्माता एस. मुखर्जी, दिग्दर्शन अजय विश्वास

उमेश श्याम दातार, जळगाव.

☐ पृथ्वीराज कपूरनी नायकाची भूमिका केलेले चित्रपट कोणकोणते? नायिका कोण?



सिकंदर चित्रपटात
पृथ्वीराज कपूर-सोहराब मोदी

— *सिनेमा गर्ल*(एर्मेलिन), *अरेबियन नाईट्स*(इंदिरादेवी), *ए बीड फॉर द थ्रोन*(लीलावती), *ए वॅगर इन लव्ह*(लीलावती), *अॅव्हेंजिंग एंजल*(एर्मेलिन), *चिल्ड्रन ऑफ द स्टॉर्म*(एर्मेलिन) या मूकपटात पृथ्वीराज कपूरनी नायकाची भूमिका केली. बोलपटांच्या आगमनानंतर त्यांनी नायकाची भूमिका केलेले चित्रपट पुढीलप्रमाणेः- *दगाबाज आशिक* (जोहरा), *राजरानी मीरा*, *इंकलाब*, *सीता*(दुर्गा खोटे), *डाकू मन्सूर*(हुस्नबानू), *ब्लड फेड*(लोबो), *मिलाप* (इंदिरा देवी), *अधुरी कहानी*(दुर्गा खोटे), *आज का हिंदुस्तान*(रोज), *चिंगारी*(सवितादेवी), *दीपक*(आशालता), *पागल*(माधुरी), *सजनी*(सवितादेवी), *राज नर्तकी*(साधना बोस), *सिकंदर*(वनमाला), *एक रात*(नीना), *उजाला*(नस्सीम), *आँख की शर्म*(कौसल्या), *भलाई*(सितारा), *इशारा*(स्वर्णप्रिता, सुरैया), *महारथी कर्ण*(लीला), *देवदासी*(मोनिका देसाई), *नल दमयंती*(शोभना समर्थ), *फूल*(वीणा), *श्रीकृष्णार्जुन युद्ध*(शोभना समर्थ), *विक्रमादित्य*(रत्नमाला), *पृथ्वीराज संयुक्ता*(नीना), *वाल्मीकी*(शांता आपटे), *परशुराम*(लीला), *आझादी के राह पर*(वनमाला), *दीपक*(विजयालक्ष्मी).

नारायण फातर्पेकर, बांबोलीम-गोवा.

☐ नाना पाटेकर आणि सदाशिव अमरापूरकर यांचा पहिला मराठी चित्रपट कोणता?

— नाना पाटेकरचा पहिला मराठी चित्रपट *सिंहासन*. सदाशिव अमरापूरकरचा पहिला चित्रपट २२ जून १८९७.

सौ. सीमा सुधीर देव, पुणे.

☐ ज्या साधनाला देव आनंद 'अभी ना जाओ छोडकर ये दिल अभी भरा नही...' असं म्हणायच, ती साधना चित्रपटसृष्टी लवकर का सोडून गेली? सध्या ती कुठे असते? काय करते?

— आजारपणात साधनाचा चेहरा विद्रुप झाला. त्यामुळे चित्रपटव्यवसायाकडे तिला पाठ फिरवावी लागली. निर्माता-दिग्दर्शक आर. के. नय्यर यांच्याशी तिचा विवाह झाला होता. त्यांच्या निधनानंतर ती मुंबईत निवृत्त व एकाकी जीवन जगत आहे.

☐ *देस में निकला होगा चांद* या मालिकेत पम्मीची भूमिका करणारी संगीता घोष अरुणा ईराणीची मुलगी आहे का?

— नाही.

नरेंद्र भागवत, पुणे.

☐ 'प्यार की दास्ताँ तुम सुनो तो कहूँ...' हे लता मंगेशकरनी गायलेले गाणं कोणत्या चित्रपटातील आहे? गीतकार-संगीतकार कोण?

— 'प्यार की दास्ताँ तुम सुनो तो कहूँ...' हे लता मंगेशकरनी गायलेले गाणे *फरार* चित्रपटातील आहे. गीतकार कैफी आझमी आणि संगीतकार हेमंतकुमार आहेत.

उमेश सुर्वे, तुळजापूर.

☐ मराठीतला पहिला सिनेमास्कोप चित्रपट कोणता?

— महेश कोठारेचा *धडाकेबाज* हा मराठीतला पहिला सिनेमास्कोप चित्रपट.

संतोष चं. हालकुडे, कुर्डुवाडी.

☐ नाना पाटेकरने राज बब्बर आणि जॅकी श्रॉफबरोबर कोणत्या चित्रपटात काम केलंय?

— नाना पाटेकरने राज बब्बरबरोबर *अंधायुद्ध*मध्ये तर जॅकी श्रॉफबरोबर *परिंदा*, *अंगार*, *अग्निसाक्षी* आणि *युगपुरुष* या चित्रपटांत काम केलंय.